याला मारिले आणि त्याच्या मुलुखावर राज्य केले, इत्यादि मूर्ख लोकांना फसविण्यासाठी केलेल्या वल्गना आता उपयोगी पडावयाच्या नाहीत, असे समजून त्यांच्यासाठी केलेल्या खड्ड्यात ते आपला देह मुकाट्याने टाकतात ! असो. कुबेराचा रावणाने पराभव केला म्हणून वर सांगितलेच आहे. पण जुलूमी राजाने दुसऱ्याचा पराभव केला म्हणजे तेवढ्यानेच तो संतुष्ट होत नाही. अन्यायी लढाईच्या पायात आणखी चोरींची भर घातल्यावाचून त्याचा आत्मा थंड होत नाही. या न्यायाप्रमाणे रावणाने कुबेरापासून त्याचे 'पुष्पक' नावाचे विमान हरण करून घेतले. दुसऱ्याला त्याच्या विमानातून ढकलून देऊन त्यात आपण विराजमान होण्याची ही जुलुमी राजांची पध्दत फार पुरातन काळापासून, थेट रावणापासून चालू आहे. जुलुमी राजांच्या ताब्यात असंख्य चिजा आलेल्या असतात. व त्यावर ते ऐषआराम भोगीत असतात. तेवढे मात्र पाहून घ्यावे. बाकी त्या वस्तु त्यांच्यापाशी कशा आल्या. याचा जर आपण विचार करू लागलो तर त्या राजांना राजे म्हटल्याबद्दल आपल्याला खचित लाज वाटेल.

## उन्मत्त रावणाचा शंकरावर राग

अशा रीतीने थोडेसे जय मिळाल्याने रावण अतिशय उन्मत्त झाला व देवांचाही उपमर्द करू लागला. एकदा पुष्पक विमानात बसून कैलास पर्वतावरून रावण जात असता त्याच्या विमानाची गती एकदम कुंठित झाली. ते पाहून रावणास फार क्रोध आला, व माझ्यासारख्या बलाढ्य राजाच्या विमानाला हरकत करण्याइतका शूर आज पृथ्वीवर कोण आहे, अशा गर्वाने फुगून तो विमानातून खाली उतरून पाहू लागला. तेव्हां त्याला असे कळले की, पार्वतीसह शंकर त्या ठिकाणी एकांतात आहेत, म्हणून तेथे सर्वांची गती शंकरांनी निरूध्द केलेली आहे. 'माझ्या विमानाला प्रतिबंध करणारा हा शंकर असा कोण मोठा आला आहे ! ' असे म्हणून त्याने पुष्पकाच्या गतीला अवरोध करणाऱ्या त्या कैलास पर्वताला आपल्या बाहूनी हालवून टाकले, तेव्हां कैलासावरील सर्व देवता भीतीने थरथर कापू लागल्या. देव आणि देवालये ही उपटून फेकून देण्याचा परिपाठ जुलूमी राजांचा नेहमीचाच आहे जणू काय 'हे देवांनो, आम्ही जसे तुम्हाला तुमच्या देवळातून उपटून टाकीत आहो, तसेच तुम्ही आम्हाला आमच्या सिंहासनावरून उपटून टाका' असे ते देवांना सुचवून ठेवीत आहेत.

## वेदवतीवरील बलात्कार

यानंतरचे रावणाचे उद्दामपणाचे आणि उन्मत्तपणाचे कृत्य म्हटले म्हणजे त्याने वेदवती नामक एका तपस्विनीवर केलेला बलात्कार होय. वेदवती ही कुशध्वजाची मुलगी होती, व तुला विष्णु पती मिळेल, असा तिला वर मिळालेला होता. म्हणून ती तपश्चर्या करीत बसली होती. तिला पाहून रावण काममोहित झाला व तिजवर बलात्कार करू लागला त्यावेळी चौदाचौकड्यांचे राज्य करणाऱ्या आपल्या स्वतःपेक्षाही विष्णू तिला अधिक मोठा वाटतो आहे, असे पाहून रावणाला तिच्या अज्ञानाबद्दल फार कीव आली. त्याने तिची खात्री करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला की अलीकडे विष्णू वगैरे कोणी मोठे नाहीत, मोठा काय तो मीच. परंतु तिची समजूत न पटून तिने शाप दिला की, ' तू मला छळले आहेस त्यामुळे मीच तुझ्या वधाला कारण होईन ' व तीच वेदवती पुढच्या जन्मी सीता झाली ! असल्या कामांध झालेल्या जुलूमी राजांचा सूड घेण्याकरिता किती तरी साध्वी स्त्रियांना आजपर्यंत पुनर्जन्म घ्यावे लागले असतील अनाथ अबलांवर बलात्कार होऊ लागले की, जुलूमी राजांच्या पापाचे घडे भरत आलेच म्हणून समजावे. ज्यांच्यावर बलात्कार केला जातो त्या अबला असतील, व त्यावेळी त्यांच्या हातून काही एक न होता बिचाऱ्या मरूनही जातील. पण ते बलात्काराचे आणि जुलूमाचे कृत्य पाहून आणि ऐकून इतर लक्षावधी लोकांच्या मनात क्रोधाग्नी भडकलेला असतो व प्रत्यक्ष परमेश्वरही आपले वज्र त्याच्या डोक्यात घालण्यासाठी हातात घेऊन तयार असतो.

## यज्ञविध्वंसाचे पातक

यापुढे रावणाने जे अघोर पातक केले, ते यज्ञविध्वंसनाचे होय. मरूत्त नावाचा राजा उशीरबीज या देशात यज्ञ करीत असता रावण तेथे गेला. या जुलूमी राक्षसाची भीती त्यावेळी इतकी पसरली होती की, त्या यज्ञात जे अनेक देव हविर्भाग घेण्याकरिता जमले होते त्यांचीसुध्दा रावणाला पाहून पाचावर धारण बसली व त्यापासून आपले संरक्षण करण्याकरिता इंद्राने मयूराचे, यमाने कावळ्याचे, वरूणाने हंसाचे आणि कुबेराने कोंबड्याचे स्वरूप धारण केले. देव देखील जुलुमी राजाला इतके भितात, तर माणसे भ्याली व पशुपक्ष्यांप्रमाणे वर्तन करून लागली, तर त्यात नवल ते काय ? रावणाने येथपर्यंत आपल्या राज्याची व पापाची पाळेमुळे बरीच दूरवर नेली. राजधानीकरिता एक सोन्याची लंका व हवा खाण्याकरिता एक विमान त्याने उपटले व देवांचा उपमर्द करून परस्त्रियांवर बलात्कार करण्याच्या वगैरे प्राथमिक गोष्टी त्याने केल्या. नंतर त्याच्या मनात असा विचार आला की, आपण एवढे मोठे राजे आणि आपले राज्य या लंकेसारख्या क्षुद्र आणि लहानशा बेटात ! हे काही ठीक नाही. असे वाटून त्याने आपले राज्य वाढविण्याला सुरवात केली. दुसऱ्याचे राज्य लुबाडून घेतल्यावाचून याचे राज्य

वाढणार कसे ! पण दुसऱ्यांचे राज्य आपण का घ्यावे, किंवा त्यात काही अन्याय आहे हे जुलुमी राजांच्या स्वप्नातसुध्दा येत नाही. आपल्याला पाहिजे आहे म्हणून आपण ते घ्यावे याच्या पलीकडे त्यांच्या धर्मशास्त्राची गतीच जात नाही. आपल्या अंगात सामर्थ्य आहे, म्हणून दुसऱ्यांची राज्ये हरण करण्याचा आपल्याला नैसर्गिक अधिकार आहे, अशी यांची समजूत झालेली दिसते. लंकेतील जुलुमी बंडखोराच्या नीतीशास्त्रातील तर पहिले सूत्र ' युध्दं प्रयच्छ, निर्जितोस्मीति वा वद । ' (युध्दाला सिध्द हो, नाही तर पराभव झाला म्हणून कबूल कर ) या प्रमाणे होते. असल्या आपमतलबी आणि जुलुमाच्या सूत्रावर राजनीती अवलंबून राहू लागली म्हणजे मग कोणत्या दुर्बल राज्याचा सुरक्षितपणा कायम राहणार आहे ! रावणाची पहिली धाड मरूत राजावर पडली व त्याच्या यज्ञाचा विध्वंस करून तेथील ऋषींना मारून रावण त्यांचे रक्त प्याला. हे लांडग्यासारखे अघोर कृत्य करून नंतर रावणाची स्वारी दुसऱ्या राजांकडे वळली. जितके जितके म्हणून ससे तितके तितके सर्व लांडग्याचे भक्ष्य, हा अगदी अप्रतिविधेय असाच नीतीमधील सिध्दांत झालेला दिसतो. कारण, त्याला अनुसरून रावणाने दुष्कंत, सुरथ, गाधि, गय, पुरुरवस्, वगैरे राजांच्या मुलुखांत जाऊन ' युध्दं मे दीयताम् निर्जिताः स्म इति वा ब्रूत । ' हा मंत्र म्हटला, व त्यासरसे ते सर्व राजे शरण आले. वास्तविक पाहता त्यांनी रावणाचा काय अपराध केला होता, की ज्यासाठी त्यांनी आपल्या स्वतंत्रतेला मुकून रावणाचे गुलाम व्हावे ? आता ते रावणापेक्षा कमी बलाढ्य होते, हा जर त्यांचा गुन्हा असेल तर मात्र त्यांना मिळालेले शासन यथायोग्य आहे असे म्हणावे लागेल. व यासाठी असाही उपसिध्दांत काढावा लागतो की, जेव्हा कोणी अन्यायी बुध्दीचा राजा बलाढ्य असेल तेव्हां इतरांनी त्याच्यापेक्षा दुर्बल राहून उपयोगी नाही, तर त्याच्यापेक्षा बलाढ्यच झाले पाहिजे. व तसे होण्याचा समय रावणाच्या वेळी जवळच येऊन ठेपला होता. कारण त्यावेळच्या बुध्दिबळालल्या राजांना जिंकित जिंकित रावण अयोध्येतील अनरण्य राजाकडे आला. तेव्हा अनरण्याचा तर पराभव झालाच; पण त्याने रावणाला असा शाप दिला की, माझ्या कुलात उत्पन्न झालेला दाशरथी राम तुला मारील. असा शाप झाला तरी त्या मदोन्मत्त राजाचे डोळे उघडले नाहीत. या सुमारास कळीचे नारद आणि जुलुमी रावण यांची ग्रंथी पडली. मग काय विचारता ? जुलुमी राजाच्या आगीत तेल ओतणाऱ्या नारदाची गाठ पडल्यावर मग कलि माजण्यास काय उशीर ? नारदाच्या सूचनेवरून रावणाने यम व वरूण या दिक्पालांवर स्वारी करून त्यांना इंद्रावर स्वारी करून स्वर्गातील लढाईत सापडलेल्या ब्रम्हदेव, इंद्र वगैरे कैद्यांना लंकेमध्ये आणून कारागृहात कोंडून ठेवले, ही तर जुलुमांची परमावधी झाली.

## सीताहरणामुळे पापाची परमावधी

पण या जुलुमाच्या भव्य आणि उच्च इमारतीवर अजून कळस तो चढवायचाच होता. तो पुढे सीतेला चोरून नेऊन तिला वश करण्याचा रावणाने प्रयत्न केला तेव्हा चढला असे म्हणावयास हरकत नाही. त्या लंकाधिपती रावणाच्या जुलुमामुळे हजारो स्त्रिया गाईप्रमाणे दीन झाल्या होत्या. त्यांच्या दुःखाचे वर्णन रामायणात फारच हृदयद्रावक रीतीने केलेले आहे. कोणी आपल्या नवऱ्यासाठी रडत होत्या, कोणी आपल्या मुलांसाठी अश्रू ढाळीत होत्या, कोणी आपल्या भावाला आठवीत होत्या, आणि कोणी आपल्या बापासाठी स्फुंदत होत्या. आणि आपल्याला या संकटातून सोडवणारा कोणी उरला नाही, म्हणून स्फुंदत होत्या. कधी मधून मधून त्या बलाढ्य रावणालाही खाकेत गुंडाळून ठेवून आपण स्वस्थ संध्यावंदन करीत बसणारे कोणी वाली भेटत, पण असे लोक भेटले म्हणजे त्यांच्या हातीपायी पडून तो आपली सुटका करून घेत असे, व फिरून गरीबगुरिबांवर अम्मल गाजवायला जात असे. अशा रीतीने या 'रावणराज्यं महाराज्यं' चा बंदोबस्त उत्तम प्रकारचा चालला असता सर्व प्रजा गांजून गेली, पृथ्वी त्या जुलुमी राजाच्या अनिवार भाराने अगदी वाकून गेली, व त्याच्या जुलुमाच्या दुःखाने कण्हू लागली. ती गाईसारखी दीन झाली, आणि क्षीरसागरात गाढ झोप घेत पडलेल्या विष्णूला आपल्या विकल स्वराने जागृत करून त्याच्याजवळ तिने आपले दुःख निवेदन केले. तेव्हां श्री भगवान परमात्मा महाविष्णू याला तिची दया आली. त्याने तिला आश्वासन दिले आणि दशरथाच्या पोटी रामचंद्र जन्मास आले व मग विष्णूंनी जे आश्वासन दिले होते, ते श्रीरामचंद्रांनी परिपूर्ण केले.

रावण हा एक जुलुमी राजा होता हे वरील रामायणातील हकीकतीवरून स्पष्टच होत आहे. तेव्हां त्याला मारणारा राम हा 'TYRANT KILLER' (जुलुमी राजाला मारणारा) होता, असे मानण्याला काही प्रत्यवाय नाही. व रामाच्या मुख्यत्वेकरून या कृत्यासाठीच आपण त्याला परमपूज्य मानीत आहो. रामाने रावणास मारले ही बातमी ऐकल्याबरोबर देवांनी देखील स्वर्गातून फुले उधळली आणि नौबदी वाजविल्या, तर मानवांना त्याबद्दल किती तरी आनंद झाला पाहिजे ! या व इतरही रामाच्या अंगच्या गुणांबद्दल आपण आज रामाची पूजा करीत आहो व आपली मुले पुढे करतील. अशा त्या श्रीरामचंद्रांचे गुणानुवाद गाण्याची इच्छा सर्वांना सर्व काळी होवो. अशी त्या सच्चिदानंद परमात्म्याशी करद्वय जोडून प्रार्थना आहे.

❑ ❑ ❑

# नित्य विजयी रघुनंदन ।

- विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक श्री साईलीला)



राम आणि कृष्ण ही भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेची दोन प्रतिके आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी भारत एक असल्याचे या प्रांतात होणारी राम - कृष्णांची भक्ती हा ढळढळीत पुरावा आहे. महाराष्ट्रातील वारकरी संतांनी विठ्ठला बरोबर 'राम' व 'कृष्णाचे' ही महात्म्य गायलेले आहे विशेषतः संत एकनाथ महाराजांनी भावार्थ रामायणाद्वारे वरिरस प्रधान रामकथा समाजापुढे ठेवून निद्रिस्त समजाला जागृत केले.

श्री. साईसच्चरित्र ग्रंथातील अध्याय १८ मधील पुढील ओव्या, श्री साईबाबांनी 'भावार्थ रामायण' ग्रंथाचे कशाप्रकारे महत्व जाणले होते. हे कथन करणाऱ्या आहेत.

दिवसा तयाचे निरूपण ।
रात्रौ वाचिती भावार्थ रामायण ।
हाही ग्रंथ गुर्वाज्ञा म्हणून ।
जाहला प्रमाण दीक्षिता ।।
असो हा प्रासादिक ग्रंथ ।
ज्ञानदेव भावार्थ दीपिका समवेत ।
समर्थ कृपाळू साईनाथ ।
वाचवीत नित्य शिरडीत ।।

**त्रिभुवनीचे सुख एक तत्त्वविठ्ठल ।**(१) अशी विठ्ठलाची एकविध भक्ती, वारकरी संप्रदायाचे मूलभूत अधिष्ठान आहे. **हेचि भक्ती, हेचि ज्ञान । एक विठ्ठलुचि जाण ।**(२) असे विठ्ठलाच्या एकविध भक्तीचे संत श्रेष्ठ ज्ञानदेवांनी अभंगातून महत्त्व प्रतिपादन केले आहे तर संत शिरोमणी नामदेव म्हणतात - **आमुचा विठ्ठल प्रचंड ।**(३) **इतरा देवांचे न पाहू तोंड** । एका विठ्ठलावाचून । न करू आणिक भजन ।। आम्हा एकविध भाव । कदा न म्हणू इतरा देव ।।

वारकरी संतांच्या या व अशा अभंगांचा नेमका अर्थ समग्र वारकरी साहित्य परिशीलन केल्यावरच कळू शकतो. या अभंगांचा काही जण गैर अर्थ घेऊन, वारकरी संत उदारमतवादी नव्हते, ते विठ्ठलाशिवाय अन्य देवच मानतच नव्हते, अन्य देवांचे निषेध करीत होते, असे हैत्वारोप करून हिंदू पंथ संप्रदाया मधील सामंजस्य नष्ट करीत असतात. वारकरी संताच्या समग्र साहित्याचे वरवर जरी अवलोकन केले तरी प्रामाणिक अभ्यासकास असे आढळून येईल की 'राम', 'कृष्ण', 'शंकर' आदि देवतांचेही त्यांनी गुणवर्णन कलेले आहे. विठ्ठलाच्या एकविध भक्तीचा अतिरेक न करता विठ्ठल हा अनेक देवतांचा महासमन्वय म्हणूनच त्यांनी पूजिला आहे, वर्णिला आहे, वारकरी संत उदार मतवादी, समन्वयवादी नसते तर रामकृष्ण **वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा रामजप ।**(४)

असे संत ज्ञानदेवांनी 'हरीपाठा' त म्हटले नसते. **नामा म्हणे शिवविष्णुमूर्ती एक । वेदाचा विवेक आत्माराम ।।**(५) असे संत शिरोमणी नामदेवांनी विठ्ठल-मूर्तीचे वर्णन केले नसते.

## अंधश्रध्दा निर्मूलन

**आमुचा विठ्ठल प्रचंड । इतर देवांचे न पाहू तोंड** या वारकरी संतउक्तीचा अर्थ काय ? हा अर्थ कळण्यास तत्कालीन स्थिती समजावून घेतली पाहिजे. त्या काळात नवस-सायास, गंडारे-धुपारे, बकरा बळी-कोंबडा अशाप्रकारे शूद्र देवतांच्या पूजनांच्या अंधश्रध्देने सारा समाज ग्रस्त झालेला होता. त्या अनिष्ठ शूद्र-देवतांच्या निषधासाठी संत नामदेवांनी 'इतरा देवांचे न पाहू तोंड !' असे म्हटलेले आहे. शूद्रदेवता पूजनांचे उच्चाटन करून अंधश्रध्दा निर्मूलनाचे वारकरी संतांनी केलेले कार्य लक्षात घेतले म्हणजे त्यांनी रचलेल्या एकविध भक्तीवाचक अभंगांचा योग्य अर्थ कळतो.

'राम' आणि 'कृष्ण' हे भारतीय संस्कृतीचे प्राण आहेत. श्वास-उच्छवासा इतके ते भारतीयांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. राम कृष्णांच्या आदर्शांनीच भारतीय संस्कृतीचे वस्त्र उभ्या-आडव्या धाग्यांनी विणलेले आहे. भारतीय एकात्मतेचीच ती दोन प्रतिके आहेत, वारकरी संतांना या गोष्टीचे यथार्थ ज्ञान व भान होते असे दिसते म्हणूनच विठ्ठलभक्तीधिष्ठित वारकरी संप्रदायाचा नाम मंत्र 'राम कृष्ण हरि' असा झाला असावा. **'राम कृष्ण उच्चार अनंत राशी तप । पापांचे कळप पळती पुढे '; 'हरि हरी, हरि हा मंत्र शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष'** ।।(६)असे हरिपाठात संत ज्ञानदेवांनी म्हटले आहे 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे वारकरी संप्रदायाच्या नित्य पठणाचा मंत्र झालेला 'हरिपाठ' संप्रदायाचा 'प्रमाण ग्रंथ (रचना) आहे.

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ आणि संथ तुकाराम या संतचतुष्ट्यासह सर्वच संतांनी रामाचे गुणगायन स्तुती केलेली आहे संत एकनाथांनी तर राम गुणगौरव करणारा 'भावार्थ रामायण' नावाचा सुमारे ४०,००० ओव्यांचा प्रचंड ग्रंथ लिहलेला आहे. संत एकनाथांनी केलेले राम चरित्र गायन संत ज्ञानदेव-नामदेव यांच्यापेक्षा काहीशा वेगळ्या हेतूने केलेले आहे. संत ज्ञानदेव-नामदेव यांचे रामचरित्र गायन हे भक्तिमार्गी आहे पण एकनाथ महाराजांनी रामचरित्राने गायन भक्तीपेक्षाही समाजामध्ये क्षात्रतेज जागृत करण्यासाठी केलेले आहे. संत ज्ञानदेव-नामदेव यांच्या अभंगातील राम 'पतितपावन,''जगदुद्धारक' 'कल्याणकारक,' 'भक्तजनतारक' आहे तर संत एकनाथांच्या भावार्थ रामायणातील राम क्षात्रतेजधारी 'प्रेरणादायी' 'स्फूर्तीदायी', 'संकटविमोचन','दुष्टांचे निर्दालन' करणारा आहे.

देखै प्राप्तार्थ जाले । जे निष्कामता पावले ।

तया ही कर्तव्य असे उरले । लोकालागी ।। (ज्ञा ३/१५४)

व्यक्तिगत जीवनात निष्कामता प्राप्त झाल्यावर 'लोकालागी कर्तव्ये' करण्याचे म्हणजेच सामाजिक बांधिलकीचे सर्व वारकरी संतांना भान होते. काळाची-समाजाची गरज ओळखून संत ज्ञानदेवांनी संस्कृत ऐवजी प्राकृत भाषेत ज्ञानेश्वरी लिहिली. वेदवंचित समाजाला नाममंत्र देऊन भक्तीच्या क्षेत्रात समतेची ध्वजा फडकाविली. संत ज्ञानदेवांच्या काळात यादवांचे म्हणजेच हिंदूचे राज्य होते. परचक्राचे भय दृष्टिपथात नव्हते. त्यामुळे स्वराज्यातील जनतेला स्वधर्माचरणाच्या उपदेशातून सत्यनिष्ठा-अहिंसा-प्रेम भक्ती या उदात्त मूल्यांची शिकवण त्यांनी दिली. त्यासाठी आदर्श पुरुष म्हणून रामकृष्णांचे त्यांनी गुणगायन केले. रामकृष्ण आम्हा सणू नित्य दिवाळी ।(७) असे म्हणत ज्ञानदेवांनी स्वराज्यातील जन भक्तिमार्गी लावण्याचे कार्य केले.

धन्य कुळ त्याचे । राम नाम हेचि वाचे । (८) दोष हरतील जन्माचे । श्रीराम म्हणताची ।। राम नाम वाट हेचि पै वैकुंठ ।(९) ऐसी भगवद्‌गीता बोलतसे स्पष्ट ।। आणिक एक एका रे विचारू ।(१०) जेथे रामनामाचा गजरू । तेथे बापरखुमादेवीवरू ।

संतश्रेष्ठ ज्ञानदेव महाराज रचित वरील अभंग 'राम' नामाची महती वर्णन करणारे आहेत. रामाच्या जीवनादर्श डोळ्यापुढे ठेवून स्वधर्माचरण करा, 'राम नामामृत रस प्या' (११) असा उपदेश-संदेश ज्ञानदेवांनी अभंगरचनांतून लोकांना दिला. 'राम नामामृत रस पी जिव्हे' म्हणत ज्ञानदेव म्हणतात-

करावां विचार । धरावा आचारा । (१२)

करावा परिकर । रामनामी ।।

समाधीचे साधन । ते राम नाम चिंतन ।

चित्ता सुख संपन्न । हर्ष जीवनी केला ।।(१२)

## मैने राम रतन धन पायौ

संत ज्ञानदेवांच्या समवेतच संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचे फार मोठे कार्य केले आहे. उत्तर हिंदुस्थानामध्ये पदयात्रा करून संत नामदेवांनी जे कार्य केले ते वारकरी संप्रदायास मोठेपण प्राप्त करून देणारे आहे. हिंदी जेव्हा

राजभाषा म्हणून सत्तारुढ नव्हती व त्या भाषेच्या प्रचार-प्रसारार्थ प्रोत्सनाहात्मक पुरस्कार जेव्हा दिले जात नव्हते अशा काळात एका मराठी भाषीक संतानी थेट अमृतसर लोहार पर्यंत उत्तर भारतात केलेल्या यात्रा व हिंदी पद रचना: संतांनी काय केले ? असे प्रश्न करणारांनी समजावून घेतले पाहिजे.

नामा म्हणे आम्हा विठाई रुक्माई ।। (१४)

आणिकांपाशी नाही चित्त माझे ।।

संत नामदेवही एकविध विठ्ठल भक्तीवादी होते पण त्यांनी हिंदी पदरचनेत विठ्ठलाची रामरुपामध्येच स्तृती गायलेली आहे वैष्णवाच्या राम उपासक शाखेबद्दल स्वर्गीय नंददुलारे वाजपेयी काय लिहितात ते पाहा म्हणजे संत नामदेवांच्या कार्याची प्रचीती येईल. श्री. वाजपेयी लिहितात - 'वैष्णव भक्ति की रामोपासिका शाखा का अविर्भाव महात्मा रामानंदने विक्रम की पंद्रहवी शताब्दी के उत्तरार्ध में किया था । यद्यपि रामानंद के पहले भी 'नामदेव' तथा 'त्रिलोचन' आदि प्रसिध्द भक्त हो चुके थे । उन्होंने भक्ति आंदोलन की एक नवीन स्वरुप देकर तथा उसे अत्याधिक लोकप्रिय और उदार बनाकर हिंदु धर्म के उन्नायकों में सम्माननीय स्थान पर अधिकार पाया' (१५)

संत नामदेव गाथेमध्ये 'श्रीराममहात्म्य' असे २७ अभंगांचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. यातील अभंग आख्यानवजा आहेत. कदाचित कीर्तनासाठीच ते नामदेवांनी लिहिलेले असावेत. त्यांच्या हिंदी रचनेत मात्र राम ठायी ठायी व्यक्त होतो.

राम जुहारी न और जुहारौ ।

जीवनि जाह जनम लत हारौ ।

आनदेव सौ दीन न भाषौ ।

राम रसाहन रसना चाषौ । (१६)

• • •

नामा कहै मेरे बंध न भाई ।

रामनाम मैं नौ निधी पाई ।। (१७)

या नामदेवांच्या काही प्रसिध्द हिंदी रचना आहेत. संत मीराबाईचे मैंने राम रतन धन पायौ ।(१८) हे भजन सुश्रुत आहे. संत नामदेवांच्या 'पायो राम रतन धन भाई ।' या हिंदी पद्यावरूनच संत मीराबाईनी वरील रचना केली असे वाटावे इतके या दोन रचना मध्ये साम्य आहे.

संत नामदेवांच्या मराठी अभंगांमध्ये रामजन्म, रामचरित्र व सीताशोध या तीन प्रकारचे रामविषय अभंग आढळतात. "या रामकथेचे स्वरूप बरेचसे स्फुट आख्यानाचे आहे. त्यातील प्रसंगाची जडण घडण रामायणाच्या आधारे, पण स्वतंत्र्य प्रतिभेने केलेली आहे. या रामकथेची रचना बरीचशी संकलनात्मक आहे." (१९)

## नित्यविजयी रघुनंदन

संत ज्ञानदेव-संत नामदेवांच्या काळापेक्षा संत एकनाथाच्या काळातील स्थिती एकदम वेगळी होती. संत ज्ञानदेवांच्या काळात यादवांचे हिंदूराज्य होते. नामदेवांच्या उत्तरकाळात महाराष्ट्रात बहामनींची मुसलमान राजवट सुरु झाली होती. ती हिंदू प्रजेस काहीशी उदारपणे वागविणारी होती असे दिसते. पण एकनाथाच्या उत्तरार्धात मुसलमानांच्या पाच शाह्या एक झाल्यानंतर हिंदूंना बाटवले जाऊ लागले. अशा बिकट काळामध्ये अत्याचाराने गांजालेल्या हिंदूंना संत एकनाथांनी रामकथेतून संघर्षाची प्रेरणा दिली. हिंदूंमधील निद्रिस्त क्षात्र तेजाला भावार्थ रामायणाने साद घातली. भावार्थ रामायणात रामकथेचे 'नित्यविजयी रघुनंदन' असे वीररसप्रधान दर्शन नाथांनी घडविले. संत साहित्यात त्या रचनेने वीररसाची भर घातली.

संत ज्ञानेश्वर-संत नामदेवांच्या पतितपावन रामास एकनाथांनी योध्दयाच्या स्वरुपात वर्णित केले. भावार्थ रामायणातील सुंदरकांडामध्ये श्रीराम प्रभू व लक्ष्मणाच्या संवादाचा एक प्रसंग नाथांनी रंगविला आहे. केवळ हा सवांद वाचला तरी नाथांच्या मनातील 'राम' समजून येतो. या प्रंसगात प्रभू श्रीरामचंद्र बंधू लक्ष्मणास म्हणतात-

मृदुपणे नाही यश कीर्ती ।

मृदुपणे नाही लाभप्राप्ती ।

मृदुपणे नाही विजयवृत्ती ।

जाण निश्चिती सौमित्रा ।।(२०)

एवढेच नव्हे तर मृदुपण संत-सन्याशांना लाभदायक व शोभादायक आहे. ते क्षत्रियांना दुष्कीर्ती पसरविणारे दूषण आहे असेही पुढील ओव्यांमध्ये श्रीरामचंद्र म्हणतात.

मृदुत्व संन्यासी धरावी शांती ।

तेणे त्यासी परमार्थ प्राप्ती ।

मृदुत्व आम्हा रायांप्रती ।

जाण अपकीर्तीकारण ।।(२१)

संत एकनाथांनी प्रभू रामचंद्राबरोबरच महाबली

हनुमानाचेही प्रेरणादायी वर्णन भावार्थ रामायणात केले आहे. हनुमानाची रामनिष्ठा वानरसेनेची एकी व अनुशासन, त्यांची समर्पित त्यागवृत्ती भावार्थ रामायणातून नाथांनी निराशा, हताश हिंदूपुढे ठेवली आणि एक धर्मरक्षण चेतना निर्माण केली.

'तुका झालासे कळस' असे संत तुकाराम महाराजांचे वारकरी संप्रदायात स्थान आहे. त्यांनीही मराठी हिंदी रचनांमध्ये 'राम' गुणगायन केलेले आहे. अर्थात हे रामगुणगायन संत एकनाथ गुणगायनापेक्षा संत ज्ञानदेव-नामदेव यांच्या सारखे आहे. ती भक्तीमार्गी रामस्तुती आहे. राम म्हणता काम क्रोधाचे दहन । होय अभिमान देशधडी । अशा प्रकारे राम महात्म्य तुकाराम महाराज्यांच्या मराठी अभंगांतून व हिंदीपदांमधून आढळते. कोदंडधारी रामापेक्षाही पवितपावन रामच संत तुकारामांना अधिक भावलेला दिसतो.

संत तुकाराम, संत रामदास यांना म्लेच्छांचे राज्य नष्ट होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची प्रभात पाहण्याचे भाग्य लाभले होते, 'बुडाला औरंग्या पापी' असे संत रामदासांनी हिंदवी स्वराज्याचे वर्णन करताना समाधानाचे इप्तितसाध्य झाल्याचे उद्‌गार काढले संत तुकाराम महाराजानाही हिंदवी स्वराज्य स्थापनेचा आनंद झाला होता व तो त्यांनी रामराज्य अवतरले अशा शब्दात व्यक्त केला आहे.

झाले रामराज्य काय उणे आम्हासी ।...

स्वप्नीही दुःख कोणी न देखे डोळा ।...

राम वेळोवेळी आम्ही गाऊ ओवीये ।...(२२)

संत तुकारामांच्या अभंग गाथेमध्ये (देवडीकर प्रत) 'सीता शोक' असे रामकथावजा १३-१४ अभंगाचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. हिंदुस्थानी दोहे, हिंदुस्थानी अभंगांचे अशा अन्य २ प्रकरणातील हिंदी रचनांमध्येही तुकाराम महाराजांनी रामनाम महात्म्याचे मोठे पण वर्णिलेले आहे.

मेरे रामको नाम जो लेवें बारोबार ।

त्याके पाऊ मेरे तन की पैजार ।।(२३)

रामनाम वारंवार घेणाऱ्याच्या पायात माझ्या कातड्याचे जोडे घालीन असा रामभक्ताबद्दल असीम निष्ठा-भाव तुकाराम महाराजांनी अनेक रचनांमध्ये व्यक्त केला आहे. 'ऐसा कर घर आवे राम' 'राम भजन सब सार मिठाई', 'राम रस जिव्हा नित चाखो'(२४) या त्याच्या हिंदी रचना रामभक्तीरसाचा उत्कट आविष्कार आहे.

संदर्भ -


१ - ज्ञानदेवांचे अभंग १३४

२ - " १२४

३ - नामदेव अभंगवाणी (मॉर्डन) अभंग क्र. ११९

४ - हरिपाठ अभंग क्र. ८

५ - नामदेव अभंगवाणी (मॉर्डण) २१४

६ - हरिपाठ १४

७ - ज्ञानदेव अभंग ८९

८ - " ९८

९ - " १११

१० - " १६०

११ - " १५९

१३ " १५४

१४ - नामदेव अभंगवाणी (मॉर्डन) १२०

१५ - " " प्रस्तावना

१६ - " " अभंग २८८

१७ - " " " २८९

१८ - नामदेव चरित्र-काव्य (सरकारी प्रकाशन) पान १२४

१९ - नामदेव अभंगवाणी (मॉर्डन) प्रस्तावना

२० - नाथांचे भावार्थ रामायण

२१ - "

२२ - तुकारामा गाथा (देवडीकर) १०७९

२३ - " ( " ) ३६५१

२४ - " ( " ) ३४९६


❑ ❑ ❑

# रामराज्यातील न्यायदान

*'रामराज्य' ही एक आदर्श राज्य व्यवस्था मानली जाते. त्या राज्यातील न्यायदान रामचंद्रांच्या न्यायनिष्ठूरतेमुळे लोकांमध्ये चर्चेचा - आदराचा विषय झालेले होते. त्या राज्यातील एका प्रसंगाद्वारे, मोठ्या उपरोधिक पध्दतीने सांगितली जाणारी एक बोधकथा -*

रामराज्यातील नागरी जीवन संस्कारयुक्त व समंजसपणाचे होते. त्याकाळी वर्णाश्रम धर्म कटाक्षाने पाळीत. त्यामुळे रामराज्यात स्पर्धेचे जीवन नव्हते. आपापले व्यवसाय जो तो वर्णधर्माप्रमाणे करीत होता. मनुष्य चारित्र्यवान, नीतीवान झाल्याशिवाय रामराज्य येत नाही. त्यासाठी राज्यकर्तेही चारित्र्यसंपन्न, व त्यागी असावे लागतात. राष्ट्राच्या दुर्दशेचे कारण, राज्यसत्ताच मानली जाते.

प्रभुरामचंद्र राजा झाल्यावर नित्य कामकाज पाहण्यासाठी दरबारी येत. राम दरबारात एक घंटा असे. फिर्यादी आल्यावर ती घंटा आपोआप वाजू लागे. परंतु दरबारात अशी घंटा वाजण्याचे प्रसंग क्वचितच येत.

एकदा एक रक्तबंबाळ झालेला कुत्रा दरबारात फिर्यादी म्हणून आला. घंटा वाजू लागली. रामानी लक्ष्मणास चौकशी करण्यास सांगितले. त्याप्रमाणे लक्ष्मण बाहेर आला पण कुणीच माणूस दिसेना. त्याप्रमाणे लक्ष्मणाने रामाला येऊन सांगितले. पण श्रीराम म्हणाले, ज्या अर्थी घंटा वाजली त्या अर्थी कुणी तरी असले पाहिजे. नीट बघ पुन्हा लक्ष्मण येताच त्याला एक जखमी कुत्रा दिसला. लक्ष्मणाने त्याला विचारले काय रे, तुझी काही तक्रार आहे काय ?

कुत्रा म्हणाला, होय महाराज ! लक्ष्मणाने श्रीरामाला हे सांगताच राम म्हणाले त्याला आत बोलावं. परंतु कुत्रा म्हणाला, मी पशु असल्यामुळे आंत येत नाही. शास्त्राधार दिलेला पाहताच लक्ष्मणाला आश्चर्य वाटले. कारण पशु पक्षीसुध्दा आपापले धर्म पाळून वागत. श्रीराम म्हणाले, त्याला सांग राजाज्ञा असल्यावर येण्यास हरकत नाही. त्याप्रमाणे कुत्रा दरबारात येऊन रामाला आपली तक्रार सांगू लागला. तो म्हणाला, मी रस्त्यात बसलो असता एका भिक्षूने आपला दंड माझ्या मस्तकावर मारला. त्यामुळे मी जखमी झालो. पण माझी तक्रार अशी आहे की, रामराज्यात, सन्याशाला क्रोध का यावा ? म्हणून त्यास दंड द्यावा. सभेला आश्चर्य वाटले. कारण स्वतःला लागले म्हणून नव्हे तर, त्याला (सन्यासाला) क्रोध का यावा, यास्तव दंड द्यायला सांगणारा कुत्रा अजबच म्हणावा लागेल. नंतर लागलीच संन्यासीबुवाला सभेत आणून विचारणा करण्यात आली.

संन्याशानी आपला गुन्हा कबूल केला व म्हणाला, राजन, मला अत्यंत भूक लागली होती म्हणून मी त्वरेने चाललो असता हा कुत्रा मध्येच लुडबुडला म्हणून मला राग आला व मी याला मारले. क्रोध येणे ही माझी चूक मला मान्य आहे. आपण द्याल ती शिक्षाही मला मान्य आहे. गुन्हा मान्य होताच. शिक्षेचा प्रश्न निर्माण झाला. संन्याशाला काय शिक्षा द्यावी याबाबत पंडितांना, ऋषी मुनीना विचारले, परंतु अशा प्रकारच्या गुन्ह्याला काय शिक्षा असावी, याबाबत कुठेही शास्त्र संमत उल्लेख आढळला नाही. म्हणून कुत्रा देईल ती शिक्षा संन्याशाने भोगावी, असे ठरले. तेव्हां कुत्रा म्हणाला, महाराज तो अधिकार माझा नाही पण राजाज्ञा म्हणून सांगतो की या संन्याशाला एकाद्या मठाचा संस्थानिक करा, तेथे भरपूर ऐश्वर्य असावे, त्याची नित्य पालखीतून मिरवणूक निघावी, असा यांचा थाट व्हावा. हे ऐकताच सर्व सभासद चकित झाले. त्यांनी रामाला विचारले ही शिक्षा आहे कि गौरव ?

राम म्हणाले, हा प्रश्न शिक्षा देणाऱ्यालाच विचारा ! तेव्हां पंडितांनी हा प्रश्न कुत्र्याला विचारला. तेव्हां कुत्रा म्हणाला, ही शिक्षाच आहे. कशी ते सांगतो. मी पूर्व जन्मी असाच देवस्थानचा मठपती होतो. मी देवस्थानची सेवा करण्यापेक्षा, देवस्थानच्या येणाऱ्या पैशावर चैन करीत होतो. देवाला मिळालेल्या वस्तु स्वतःसाठी वापरी. देवाच्या नंदादीपासाठी आलेले तेल मी तो न लावता, घरी भजासाठी वापरी. एवढेच

नव्हे तर, देवस्थानच्या जागी धर्माच्या नावावर अनेक बंडे उभी केली. लोकांना पै, पैशासाठी फिरविले. जीर्णोध्दारासाठी मिळालेल्या पैशाने मी बायकोला दागिने केले. मठाची व देवस्थानची धार्मिकता वाढविण्याऐवजी मी तेथे अनेक धंदे केले. म्हणून मला ही श्वानयोनी प्राप्त झाली. म्हणून, या संन्याशाला मठपती केल्यावर तो हेच करेल आणइ श्वान होईल अशा प्रकार श्री रामा हा सत्कार नसून ही शिक्षाच होय. एवढे सांगून कुत्र्याने प्रायोप्रवेशन करून, आपला देह श्रीरामाच्या चरणी संपविला. या न्यायाचा आजच्या मठाधिपतींनी जरुर विचार करावा.

❑ ❑ ❑

## - निवेदन -

**'श्री साईलीला' द्वैमासिक मालकीबद्दल व अन्य तपशील दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिध्द करावयाचे निवेदन.**

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | - | द्वैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.४. |
| ४. प्रकाशकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| ६. हे पत्र ज्याच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्काहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते | - | श्री साईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, द. म. सुकथनकर यानुसार असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

*द. म. सुकथनकर*
(प्रकाशकाची सही)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## असे हे पावन साईनाम

साई साई वाचे वदता
भव भय हरते, हरते चिंता
मनास लाभे, मग शांतता
करते आपुले चित्त पावन
असे हे पावन साईनाम ।।१।।
पावन शरीरीं पावन हे मन
पावन मनीं त्या, पावन ही धून
'साईनाम' करी मुदित हे मन
'साईधून' करी मुदित हे मन
असे हें पावन साईनाम ।।२।।
साखर जितुकी गोड आहे
दूध जितुके गोड आहे
दुग्धीं शर्करा मिळून जातां
गोडी वाढे महान
असे हें पावन साईनाम ।।३।।
भाव भक्तीने नाम घेतां
त्वरित पावते तें भगंवता
विरुन जाते सकल अहंत
मिळतो चित्ता आराम
असे हें पावन सईनाम ।।४।।
बैठकी जेव्हां पक्की होते
नामाची मग गोडी लागते
काळ वेळ हें बंधन नुरते
अविरत येते नाम
असे हें पावन साईनाम ।।५।।
अशीच आहे नाम समाधी
पाठीं नुरते कांही उपाधी
नामी होते एकरूप मन
होता बंधमुक्त तुम्ही जाण
असे हें पावन साईनाम ।।६।।
नाम समाधी यदा लागते
भाव भावना सर्वहि विरते
तू - मी पणहि नष्ट होते
उरते एकच नाम
असे हें पावन साईनाम ।।७।।
'सा' म्हणजे ती सायुज्यमुक्ती
'ई' म्हणजे ती ईश शक्ती
परमेशाची शक्ती मिळतां
काय हवे तुज आन
असे हे पावन साईनाम ।।८।।

*- गंगाधरसुत*

# संत तुलसीदासांचा 'श्रीराम'

**हिंदी भाषिकांमध्ये संतकवि तलसीदास यांचा 'रामचरित्रमानस' हा ग्रंथ सर्वाधिक लोकप्रिय ग्रंथ आहे. तुलसीदासाच्या चौपाट्या उत्तर भारतात घरोघर म्हटल्या जातात. महात्मा गांधी यांनी या ग्रंथास आपल्या जीवनातील एक प्रेरणास्थान मानलेले आहे.**

**आखर मधुर मनोहर दोऊ ।**
**बरन बिलोचन जन जिय जोऊ ।**
**सुमिरत सुलभ सुखद सब काहू ।**
**लोक लाहु परलोक निबाहू ।।**

(मानस १/१९/१)

'राम' ही दोन अक्षरे उच्चारण्यास व पाहण्यासाठीही सुंदर आहेत. स्मरण करण्यास ही दोन अक्षरे अत्यंत सुलभ व सुखकारक आहेत. इहलोक व परलोक या दोन्ही लोकांचा निर्वाह करण्यास ही दोन अक्षरे समर्थ आहेत.

खुद्द श्रीगणेश, भगवान शिवशंकर, तथा वाल्मिकीमुनि हे श्रीरामाचा महिमा योग्यप्रकारे जाणतात कारण तो त्यांनी स्वतः अनुभवलेला आहे. 'राम' हे एक नाव इतर देवतांच्या एक हजार नावांएवढे प्रभावी आहे. असे संत कवी तुलसीदासजी म्हणतात.

**महामंत्र जोई जपत महेसू ।**
**कासी मुकुति हेतु उपदेसु ।।**
**महिमा जासु जान गनराऊ ।**
**प्रथम पूजिअत नाम प्रभाऊ ।।**
**जान आदिकवि नाम प्रतापू ।**
**भयऊ सुध्द करि उल्टा जापू ।**
**सहस नाम सम सुनि सिव बानी ।**
**जपि जेई पिय संग भवानी ।।**

(मानस १/१८/२-३)



राम नामाचा हा मंत्र काशी प्रमाणेच मोक्षदायी असून या नामाचा प्रभाव म्हणूनच राम राम असा जप करून वाल्याचा आदिकवी वाल्मिकी झाला. खुद्द भवानीने सुध्दा शिवाबरोबर रामनामाच्या जपाचा आनंद अनुभवला आहे. असा रामनामाचा महिमा सांगून कवी तुलसीदास म्हणतात -

**नाम प्रभाऊ जान सिव नीको ।**
**कालकूट फलू दीन्ह अमीको ।।**

(मानस १/१८/४)

राम नामाच्या जपाच्या प्रभावामुळेच भगवान शंकर देव-दानव समुद्रमंथनातील हलाहल (वीष) पिऊन पचवू शकले. अनेक महान योगी राम नामाचा जप करीत ईश्वर साक्षात्काराचा अनुपम आनंद भोगतात तर अनेक संसारिक जीव राम नामाच्या जपाने भवताप मुक्त-विरक्त होतात.

**नाम जीहँ जपि जागहिं जोगी ।**
**बिरती बिरंचि प्रपंच बियोगी ।**
**ब्रह्मसुखहि अनुभवहि अनूपा ।**
**अकश अनामय नाम न रूपा ।।**

(मानस १/२१/१)

**जाना यहहि गूढ गति जेऊ ।**
**नाम जीहँ जपि जानहि नेऊ ।**
**साधक नाम जपहि लय लाएँ ।**
**होहि सिध्द अनिमादिक पाएँ ।**

**जपहि नाम जन आरत भारी ।**

**मिटहिं कुसंकट होहिं सुखारी ।।**

(मानस १/२१/२)

ज्यांना ईशतत्त्वाचे गूढ ज्ञान व्हावे असे वाटते त्यांना केवळ राम नामाच्या जपाने ते आत्मसात होते. साधकांना रामनामाने संसारातील अनेकांची दुःखे-संकटे-चिंता दूर होतात.

**नाम प्रसाद संथु अविनासी ।**

**साजु अमंगल मंगल रासी ।**

**सुक सनकादि सिध्द मुनि जोगी ।**

**नाम प्रसाद ब्रह्मसुख भोगी ।।**

**नारद जानेऊ नाम प्रतापू ।**

**जग प्रिय हरि हरि हर प्रिय आपू ।।**

**नामु जपत प्रभु कीन्ह प्रसादु ।**

**भगत सिरोमनि मैं प्रल्हादू ।।**

**ध्रुव सगलानि जपेऊ हरि नाऊँ ।**

**पायऊ अचल अनूपम ठाऊँ ।।**

रामनामाच्या महात्म्यामुळेच शुक व सनकादी ऋषी मुनी राम नाम जपताना दिसतात तर नारद 'नारायण' 'नारायण' जयघोषाबरोबरच रामनाम जप करतात. भक्त प्रल्हाद व ध्रुव ही दोन दिव्य बालके तर नाम जपाचे आदर्श आहेत.

सध्या कलियुग चालू असून या काळात नामस्मरण - नाम जप म्हणजेच राम नाम हा एक कल्पवृक्ष आहे. या काळात ना कर्म, ना योग, ना यज्ञ, ना याग, ना ज्ञान तारक असून केवळ नामभक्तीच तारक आहे. म्हणून सर्वांनी रामनाम जपाने हा भवसागर तरुन जावे.

❑ ❑ ❑

मैं संत तुलसीदास की रामायण को भक्ति-मार्ग का सर्वोत्तम ग्रंथ मानता हूँ ।

*-महात्मा गांधी*

## शिरडी माझे पंढरपूर


साई माझी विठाई
भक्ताची माउली
उठता बसता सांभाळी ।।१।।
गुरूवारी भक्त येती
साई दर्शन घेती
तन मन विसरती
साई चरणी लीन होती ।।२।।
साई मंदिराचा दिसता कळस
मना दाटतो हर्ष उल्हास
राहती भक्त उभे गर्दीत
जय जयकार करती साईनाम ।।३।।
थंडी उन पाऊस
तमा नाही भक्तास
साई दर्शनाची सारखी ओढ
मन होई समाधानी शांत ।।४।।
शांत प्रसन्न मुद्रा
झळके तेजस्वी परभा
मुखी क्षमा दया करूणा
माऊलीची माया नेत्रा ।।५।।
रूप सुंदर मनोहर
मुखावरी सदा प्रसन्न तेज
श्रध्दा, सबूरी संदेश
जीवन साफल्य झाले वाटे मज ।।६।।
भक्त साईचरणी लीन
साई भवसागर पार करील
अपार सुख समाधान मज वर
शिरडी माझे पंढरपूर

**- तुकाराम ना. कोत्तावार**
परभणी

संत तुकाराम कृत

# महाबळी हनुमान स्तुती

चैत्र महिन्यात रामनवमी नंतर हनुमान जयंती येते. त्या निमित्त संत श्रेष्ठ तुकाराम महाराजकृत हनुमंत स्तुती -



शरण शरण हनुमंता । तुज आलो रामदूता ।।
काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या या सुभटा ।।
शूर आणि धीर । स्वामिकाजी तू सादर ।।
तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ।।

* * *

हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ।।
तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ।।
करोनी उड्डाण । केले लंकेचे शोधन ।।
जाळियली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ।।

* * *

काम बांदवडी । काळ घातला तोडरी ।।
तया माझे दंडवत । कपिकुळी हनुमंता ।।
शरीर वज्रा ऐसे । कवळी ब्रम्हांड जो पुच्छे ।।
रामाच्या सेवका । शरण आलो म्हणे तुका ।।

* * *

## बालभक्तांसाठी



# साई दरबारातील प्राणीसभा

साईदरबारात एकदा
भरली प्राणीसभा
श्यामसुंदर मधे उभा
बोले कसा बरवा
मी आहे श्यामसुंदर
तुलना नाही कोणाबरोबर
साईबाबांचा दरबार
ना मानाल तर खबरदार ! ...।।१।।
मी आहे मार्जारी
माझी पिल्ले मला प्यारी
मनी मातृप्रेम भारी
जोडा नाते साईश्रीहरी ...।।२।।
मी आहे कासवी
पिल्ले माझी पैलतरी
साईकृपा दृष्टी
बाळे होती मोठी ...।।३।।
मी आहे वाघोबा
गगनभेदी गर्जना
गती साई विना
कोण मला देईना ...।।४।।
मी आहे वीरभद्र
या जन्मीचा सर्प
साई मायबाप
करु न देती हत्या पाप ...।।५।।
मी आहे बसवप्पा
करी डरॉव डरॉव
जन्मे बेडूकराव
साई देती न्याव ...।।६।।
मी आहे डुक्कर
चिखलातील सुवर
बाबांची भाकर
खाऊन दिला ढेकर ...।।७।।
मी आहे कुत्रा
साईनी दिला भाकर तुकडा
मिटली माझी क्षुधा
फिटली लक्ष्मीची शंका ...।।८।।
आम्ही मुंग्या लहान
क्षूद्र जीव सहान
काशिराम शिंप्यांना
दिले जीवदान ...।।९।।
प्राण्यांचे ऐकून गान
साईंनी तुकवली मान
म्हणाले -
बाळांनो ! तुम्ही नव्हे सान
माणसांपरीस आहात महान ...।।१०।।

*- साईसेविका*

# साईचिंतन

कलियुगाच्या प्रभावाने सारा समाज आज अधःपतित होताना दिसत असून सांस्कृतिक सामाजिक मूल्ये नष्ट होत आहेत. अशा अंधारलेल्या या काळात साई संदेश हाच एक प्रकाशकिरण असून तेच सुख शांतीचे आशास्थान आहे.

प्रकृती वा जननी जेव्हा जन्म येते तेव्हा ती सर्व शक्तीमान असते. अधर्म - अनिति यांचे प्रमाण जगात प्रमाणाबाहेर वाढते तेव्हां स्वतः शक्ती जन्माला येते आणि तिचेच नामकरण साई (स + आई) असे साहजिकच ठेवले जाते. प्रेमाविना भव्य - दिव्य सत्कार्य करताच येत नाही. प्रेम ही जगाची बैठक आहे. साई म्हणजे प्रेमाचे प्रत्यक्ष प्रतिक होय. म्हणूनच साई म्हणजे जगाचे आजचे आशा स्थान आणि आधार - स्तंभ आहे. म्हणूनच साई म्हणजे साक्षात ईश्वर होय.



जगाचा सदुपयोग त्यागाद्वारे कसा करता येतो याची प्रत्यक्ष शिकवण साईने जगाला दिलेली आहे. अंगी प्रेम असल्याविना त्याग सिध्द होत नाही हा सिध्दांत साईने जगाला प्रदान केलेला आहे.


साई ही प्रत्यक्ष जगन्माता आहे. मातेच्या ममतेने आज साई सारे जग सांभाळित आहेत. जगातील मायेला गोंजारून ते माया-शक्तीचा सदुपयोग जगाच्या कल्याणार्थ करीत आहेत. त्यामुळे जगातील सर्वच लोकांचे कल्याण तरी होत नसले तरी अकल्याणाचे जगातील वास्तव्य कमजोर झाले आहे, हे सूज्ञ व्यक्तीला आज दिसत आहे. याचाच अर्थ अधर्म आणि अनीति यांचे हळुहळु उच्चाटन होत आहे. जगाचा समतोल सावरण्याचे अद्‌भुत सत्कार्य आज साई करीत राहिलेले आहेत.

वित्त-विद्वत्ता यांना आचरणयुक्त शीलाची पार्श्वभूमी बनविण्याचे अतिशय मोलाचे सत्कार्य आज साई करून राहिलेले आहेत. शीलाविना वित्त - विद्वत्ता दुबळी ठरते हे साऱ्या जगाला आज साईने दाखवुन दिले आहे. आचरणयुक्त शील हे वित्त - विद्वतेपेक्षा खात्रीने श्रेष्ठ आहे याचा दाखला साईने जगाला दाखवुन दिला आहे. जगाचे विकृत स्वरूप वित्त-विद्वत्ता निर्मित आहे. हे साईने सिध्द करून दाखविले आहे. वित्त-विद्वत्ता माणसांच्या अहंकार बळावित असते. याचा पुरवा म्हणजे आजच्या जगात सर्वत्र दिसून येणारी विकृती होय. ही विकृती दूर करण्याचे सत्कार्य आज साई करीत आहेत.

मानव - जन्म म्हणजे पूर्व पुण्याईने मिळालेली सुवर्ण - संधी होय; पुण्याईने केलेली ही मात होय. कर्म आणि त्याचा परिणाम एकत्र वाटचाल करीत असतात. या प्रक्रियेला "कार्यकारण-भाव" असे संबोधिले जाते. मानवाला कर्मामध्ये कुशलता निर्माण करण्याची क्षमता निश्चितच आहे. कर्मातील या कुशलतेला भगवत् गीतेने "योग" म्हणून गौरविलेले आहे. हा योग प्रत्येक माणसाने साधावा यातच त्याची बुध्दीमत्ता दिसून येते. बुध्दीचे खरे वैभव ते हेच होय. या योगाद्वारे मानवाचा माधव होऊ शकतो हे साईप्रणित सत्य होय. अहंकारावर मात करण्याचे सामर्थ्य या सत्यामध्ये खचितच आहे. अहंकार असणे म्हणजे अज्ञान अंगी बाळगणे होय. अहंकारामुळे आत्मियता लोप पावते. अंगी असणाऱ्या सद्‌गुणांनी माणूस सुशोभित दिसत असतो. सद्‌गुणांनी बुध्दीचे रूपांतर सद्‌बुध्दीत होत असते आणि ही सद्‌बुध्दी म्हणजे प्रतिभा होय. प्रतिभा ही आत्म्याच्या दिशेकडे झेप असते. प्रतिभेची ही अद्‌भूत सूक्ष्म शक्तीच हे दिव्य आणि भव्य कार्य करण्यास समर्थ असते. प्रतिभेचे सामर्थ्य कल्पनातीत असल्यामुळे सामान्य बुध्दीला प्रतिभेचे आकलन होत नाही. आत्म्याशी नाते जोडणारी प्रतिभा हा मानवाचा सर्वश्रेष्ठ अलंकार होय. प्रतिभेचे जग म्हणजे पृथ्वीतलावरील स्वर्ग होय याची सर्वोच्च शिकवण साईने जगाला देऊन ठेवलेली आहे. या प्रेमाच्या शिकवणीमुळे प्रेम-साई हे नांव बाबांना शोभून दिसले. प्रेमात वसत असलेल्या अफाट शक्तीमुळे साईने आज सारे जग जिंकले आहे. प्रेमाचा विजय हा साई -विजय होय.

कलियुग आज संघर्षाच्या गडद अंधाराने ग्रासले असता साईचा प्रेम - किरण हाच जगाचा एकमेव आधार बनलेला दिसत आहे. साई - प्रेमाचा वर्षाव आज जगाला मोठा दिलासा देत आहे. जगाचे वाळवंट बनले असताना साई-प्रेमाची हिरवळ हे जगाचे एकमेव आश्रय स्थान बनले आहे. शुध्द आचरण हेच साईचे पूजन होय. हेच पूजन आज जगाला शुचिर्भूत राखण्यास योग्य आणि समर्थ आहे.

❑ *शाम जुवळे*



# शिरडी वृत्त

*__श्री साईबाबांनी__ त्यांचे हयातीत दुःखीतांचे दुःख दूर करणे, आजाऱ्यावर उपचार करून आजार दूर करणे, भिक्षा मागून अन्नदान करणे, हिंदू-मुस्लीम व सर्व धर्मीयात सलोखा निर्माण करण्याचे लोकाभिमुख कार्य केले.*

*तेच कार्य श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त मंडळाने सुरू ठेवले आहे. मा. श्री. द. म. सुकथनकर यांचे अध्यक्षतेखालील विश्वस्त मंडळाने शिरडीत येणाऱ्या भक्तांसाठी अनेक नवे नवे उपक्रम योजले आहेत. त्यापैकी कांही उपक्रम मूर्त स्वरूपात आणले आहेत. व काहींचे कार्य चालू आहे. वाचकांना त्या कार्याची कल्पना यावी म्हणून येथे काही प्रमुख कार्यांची माहिती देत आहोत.*

### ❑ भक्तांकरिता गरम पाण्यासाठी सोलर पध्दती :-

भक्तांना २४ तास गरम पाणी उपलब्ध व्हावे याकरिता सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर साईनिवास या इमारतीत तसेच सर्वांसाठी उपलब्ध असलेल्या स्वच्छता गृहात सोलर पध्दतीचे गरम पाणी दि. १५ जानेवारी ९६ पासून उपलब्ध करून देण्यास प्रारंभ झालेला आहे. सदर योजनेमुळे वीज खर्चात कायमस्वरूपी कपात होईल. संस्थानला सदर योजनेची सबसीडी मिळणार आहे. उपयुक्तता विचारात घेऊन संस्थानच्या इतर इमारतीवरही अशीच यंत्रणा बसविणे विचाराधीन आहे.

### ❑ स्वयंसेवी प्रसाद भोजन व्यवस्था : -

शिरडीस येणाऱ्या भक्तांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रसाद भोजन घेणेकरिता हजारोंच्या संख्येने भक्तांना लाईनमध्ये ताटकळत उभे रहावे लागे. त्यासाठी स्वयंसेवी (Self Service) प्रसाद भोजनाची व्यवस्था स्वतंत्ररित्या दि. ३०-१२-९५ पासून सुरु करण्यांत आली आहे. या उपक्रमांस भक्तांचा उत्स्फूर्त वाढता प्रतिसाद मिळाला आहे. व भक्त समाधान व्यक्त करीत आहेत. दररोज एक हजार भक्त या सोईचा लाभ घेत आहेत.

### ❑ निवासस्थाने : -

भक्तांची वाढती संख्या यामुळे निवासस्थाने अपुरी पडत आहेत. स्थानिक हॉटेल, लॉजचे भक्तांना न परवडणारे भाडे विचारात घेता संस्थानने भक्तांकरिता भव्य अशी ५०० खोल्यांची व अनेक व्हीआयपी ब्लॉक, भव्य हॉलची व भरपूर प्रसाधनगृहे असलेली भव्य इमारत बांधलेली आहे. या नव्या भक्तनिवासापासून मंदिर परिसरात जाणेयेणेसाठी मोफत बस सेवा संस्थानतर्फे उपलब्ध करून देण्यांत आली आहे. तसेच या ठिकाणी संस्थानने दि. १५.१.९६ रोजी कॅन्टीन उपहारगृहची सुविधा वाजवी दरात उपलब्ध करून दिली आहे. तेथे लवकरच प्रसाद भोजनाची व्यवस्था कार्यान्वयीत करण्यांत येणार आहे.

### ❑ प्रशासकीय यंत्रणा :-

भक्तांच्या सोईसुविधा तसेच सुलभ दर्शनाकरिता संस्थानने कर्मचारी वर्ग नेमलेला आहे. सध्या १२०० कर्मचारी संस्थानमध्ये आहेत. संस्थानमध्ये मंदिर विभाग, सुरक्षा विभाग, प्रसादालय विभाग, कन्या विद्या मंदिर, आय. टी. आय.,

इंग्लिश मिडीयम स्कूल, सुसज्ज रुग्णालय असे अनेक विभाग आहेत.

एवढ्या मोठ्या प्रशासनासाठी पूर्वी दोन प्रशासकीय अधिकारी होते. प्रत्येक बाबीवर जातीने लक्ष देऊन कामे करून घेणे, नवीन उपक्रम राबविणे यासाठी आणखी दोन प्रशासकीय अधिकारी नेमले आहेत. त्यामुळे कामांना वेग येऊन कामाची गती तसेच गुणवत्ता यात वाढ झाली आहे.

**❑ पाकशाळेचे नूतनीकरण : -**

दररोज सरासरी ११ ते १२ हजार भक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेत असतात. गर्दीच्या वेळी दररोज २५००० भक्त प्रसाद घेतात. १२ वर्षाखालील व्यक्तींना प्रत्येकी रु. २/- व त्यावरील व्यक्तींना प्रत्येकी रु. ४/- अशा नाममात्र या दराने पूर्ण भोजन देण्यांत येते.

मोठ्या प्रमाणावर प्रसाद भोजन तयार करणेकरिता १० एम. टी. क्षमतेच्या दोन एल. पी. गॅस टँक आहेत. ऐनवेळी गॅस पुरवठा वेळेत न झाल्यास पदार्थ तयार करणेस अडचणी येतात यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून दोन बॉयलर बसवून स्टीमच्या सहाय्याने स्वयंपाक करणेची योजना कार्यान्वित करण्यांत येत आहे.

सुधारीत पध्दतीचे नऊ कुकर बसविण्यांत येत आहेत. त्यामुळे इंधनाची बचत होणार असून पर्यायी इंधन व्यवस्था म्हणून स्टीमचा (वाफेचा) वापर करण्यांत येणार आहे. या उपक्रमांवर संस्थान अंदाजे २० लाख रुपये खर्च करणार आहे.

**❑ समाधी मंदीराची देखभाल : -**

समाधी मंदिराची इमारत "श्री" बाबांच्या देखरेखीखाली बांधणेत आली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी भक्तांच्या भावना, श्रध्दा निगडीत आहेत. तिच्या भिंतींना ओलावा आल्याचे निदर्शनास आलेवरून बांधकामाच्या भक्कमतेची पाहणी/तपासणी नामांकित तज्ञ वास्तुशिल्प तंत्रज्ञाकडून करण्यांत आली असता भिंतीत पाणी जिरत असल्यामुळे भिंती कमकूवत झालेचे निदर्शनास आले. तज्ञाच्या सल्ल्यानुसार सदर इमारतीचे पहिल्या मजल्यावरील खोल्यात असणारे सामान हलवून भार कमी करण्यांत येत आहे.

**❑ रस्त्याची दुरूस्ती : -**

गेली अनेक वर्षे श्री बाबांच्या पवित्र शिरडी गावात चांगले, डांबरी, काँक्रीट रस्ते नव्हते. अर्थात गावातील रस्ते करणे हे नगरपालिकेचे काम असले तरीही संस्थानने स्वखर्चाने रस्त्यांची दुरुस्ती, डांबरीकरण, इत्यादी उपक्रम राबविले आहेत.

संस्थानमध्ये उत्सवांत देशातील नामवंत कलाकार येऊन बाबांसमोर हजेरी देतात व त्यांच्या कलेचे सार्थक करतात. त्यांचेसाठी कायम स्वरुपी भव्य खुले स्टेज बांधण्याचे कामास संस्थानने सुरुवात केली आहे.

**कंदिलाचा चमत्कार**

***बाबा जागृत व कार्यरत असल्याचा अनेकांना अनुभव आहेच, त्यात सध्या द्वारकामाईत हलत असलेला कंदिलाचा चमत्कार प्रत्यक्ष अनुभवास येत आहे. दि. १५.११.९५ रोजी द्वारकामाईतील कंदिल एका ठराविक वेगाने हलत होता. त्यानंतर दि. १५.१.९६ पर्यंत एकूण चार वेळेस हा चमत्कार घडला आहे.***

**❑ सुलभ स्वच्छतागृह : -**

अतिशय गरज असलेली, व सर्व सोईंनी युक्त अशी सुलभ स्वच्छता गृहाची वास्तू आकार घेऊ लागली आहे. या तीन मजली इमारतीत अनेक संडास, बाथरूम तात्पुरते सामान ठेवण्यासाठी लॉकरूम यांच्या अद्यावत सोई उपलब्ध असतील.

**❑ मंदीर विस्तारीकरण : -**

नमूद करण्यास आनंद होतो की, श्री साईबाबांच्या भक्तांची वाढती गर्दी लक्षांत घेऊन मंदीर व मंदीर परिसर विस्तारीकरण उपक्रमाची रुपरेखा साकारली असून देशपातळीवर मान्यवर आर्किटेक्ट यांची मंदिर परिसर विकास आराखडा स्पर्धा घेण्यात येत आहे. श्री बाबांचे मंदीर व मंदीर परिसर हे देशाचे वैभवस्थान ठरावे अशा अपेक्षेने हा उपक्रम हाताळण्यात येत आहे

**❑ पारायण कक्ष : -**

श्री बाबांच्या पोथीचे पारायण अनेक भक्त शिरडी येथे येऊन करीत असतात. पारायणासाठी आजवर वेगळी व्यवस्था नव्हती. भक्तांची ही अडचण लक्षांत घेऊन एक सुसज्ज पारायणकक्ष संस्थानने निर्माण केला आहे.

**❑ लाडू प्रसादाची विक्रमी विक्री : -**

भक्तांना चांगला प्रसाद मिळावा म्हणून संस्थानने लाडू, खोबरा बर्फी, नास्ता पाकीटे यांची वाजवी दरांत विक्री सुरु केली आहे. व भक्तांचा त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) नास्ता पाकीटे | - | रु. २.५० |
| २) बूंदी लाडू (शुध्दतुपातले) | - | रु. ५.०० (दोन लाडू) |
| ३) खोबरा बर्फी | - | रु. ३.०० |

अशा माफक किंमतीत पदार्थांची विक्री केली जाते.

दि. २०.१.९६ या शनिअमवास्येच्या दिवशी एकाच दिवसांत प्रसाद लाडूची रु. १ लाख किंमतीची विक्रमी विक्री झाली.

## भक्तांना विनंती

१) सकाळी ७.३० चे अगोदर प्रसाद, हार ताटे स्विकारली जात नाहीत. काही भक्त पहाटेस काकड आरतीला येतानांच प्रसाद हाराची ताटे घेऊन येतात व त्यामुळे त्यांना काकड आरतीस प्रवेश मिळू शकत नाही. तरी कृपया काकड आरतीस येताना प्रसाद हाराची ताटे भक्तांनी आणू नयेत. गर्दीचे वेळी ताटापेक्षा " कॅरीबॅग" मध्ये हार नारळ आणल्यास गर्दीत भक्तांस ताटे लागणे, जागा आडणे इत्यादीवर मात करता येईल. सर्व भक्तांनी या बाबत संस्थानला सहकार्य करावे.

२) बरेच भक्त काकड आरतीसाठी काचेच्या बाटलीतून गुलाब पाणी आणतात. गर्दीत अनेकवेळा काचेच्या बाटल्या फुटून काचा विखुरतात व त्या काढून टाकीपर्यंत दर्शन रांग थांबवावी लागते. भक्तांनी शक्यतो प्लास्टीक बाटली मधील गुलाबपाणी खरेदी करून संस्थानला सहकार्य करावे.

३) संस्थानतर्फे गरीबांकरीता मोफत अन्नदान कक्ष चालविले जाते व त्याचा दररोज २५० ते ३०० गरीब लोक फायदा घेतात. तरी भक्तांनी भिकाऱ्यांना भोजन तिकीटे देऊ नयेत. अशी फुकट मिळालेला भोजन तिकीटे भिकारी इतर भक्तांना अधिक किंमतीला विकतांना दिसतात. तरी या बाबतही भक्तांनी संस्थानला सहकार्य करावे व प्रसाद भोजन तिकीटे फक्त स्वतः पुरतीच विकत घ्यावीत. अशी संस्थानतर्फे सर्व भक्तांना विनंती आहे.

❑ ❑ ❑

## हरिनाम ज्याचे मुखी

भाव धावा, क्रोध धावा, साधा सोपा व्यवहार
हरिनाम ज्याचे मुखी, त्याचा गोडच संसार
भल्या बुऱ्यांशी तो नाते, रोज जुळवून घेतो
भजन किर्तन घरी, असा भाग्यवान होतो
प्रेमानंद ह्रदयात, नांदतसे निरंतर
हरिनाम घेई त्याला लाभतसे खरी आत्म शांती चित्ति
लाभ हानी कांही होवो, सुख समाधान अंती - निरंतर
ह्रदयात प्रत्येकाच्या, दिसुनि ये सर्वेश्वर
हरिनामे प्रेम क्षेम, हरिनामाने विवेक
हरिनाम घेई त्याचे पाठी सदा हरि एक
क्रोध सारा सरूनिया-आधी व्यधी टळणार

- दत्तात्रय जयवंत जोशी

## शिरडीच्या साईबाबा !

प्रगट आज तू व्हावे रे
शिडीच्या साईबाबा..... ।।धृ।।


तूच आहे येथे मालक सर्वांचा
दीन - दुबळ्या या गोर गरीबांचा
तूच आहे एक विश्वविधाता
आम्ही आलो तुझ्या चरणाशी
आता

शिरडीच्या साईबाबा...।।१।।
शिरडीस लागता भक्तांचे पाय
दुःखही सरती हरती अपाय
तुझ्या मंदिरात वाजते विणा
कधी तू दिसतो गोकूळचा राणा
शिरडीच्या साईबाबा....।।२।।

हिंदू - मुसलमान शिख ईसाई
भाऊबंध सारे तुझ्याच पायी
शिरडीत सारे भेद ते सरती
भक्ती भावाला येऊन भरती
शिरडीच्या साईबाब...।।३।।

यात्राही केल्या तिर्थेही केली
पूजा ही पूर्ण शिरडीत झाली
तुझ्याच चरणी ठेवितो माथा
रुप तुझे तू दाखवी आता
शिरडीच्या साईबाबा....।।४।।

- कमलाकर राऊत



२६ जनेवारी १९९६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त शिरडी येथे श्री साईबाबा संस्थानच्या परिसरात ध्वजवंदन करण्यात आले. ध्वजफडकविण्यास जाताना प्रशासन अधिकारी श्री. सुरेश थावक. मागे संस्थानचा सेवक वर्ग



श्री साईबाबा संस्थानच्या वतीने 'अल्पबचत' योजनेमध्ये ५० लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. संस्थानच्या वतीने गुंतवणूक रक्कमेचा चेक कार्यकारी अधिकारी श्री. ओमप्रकाश देशमुख यांनी अहमदनगरच्या जिल्हाधिकारी श्रीमती मेधा गाडगीळ यांना दिला व गुंतवणूक प्रमाणपत्रे स्वीकारली. सोबत श्री. बोंडे, श्री. गायकवाड, व श्री. आपटे.

# रामनवमी उत्सव (१९९५) क्षणचित्रे




श्री साईबाबांच्या फोटोची व पोथीची पूजा आणि मिरवणूकीने शिरडीतील रामजन्मोत्सवाचा श्रीगणेशा होतो. संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त बाबांच्या फोटोची व पोथीची मिरवणुक घेऊन जातानाचे छायाचित्र



१) श्री साईसच्चरिताचे अखंड पारायण हा उत्सवातील भाविकभक्तांचा आवडता भाग. पारायणाचा प्रारंभ करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर
२) श्री साईबाबांचे उत्सवातील मंगलस्नान



रामजन्मोत्सवाचे कीर्तन व जमलेला साईभक्त श्रोतृगण



रामजन्मोत्सवा निमित्त मंदिर परिसर सुशोभित करण्यात येतो.
अनेक चित्ताकर्षक देखावे सादर केले जातात. अशा देखाव्यांपैकीचा एक देखावा.

# अभिप्राय...




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली ७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी, इंग्रजी आणि मराठीत प्रसिध्द होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे; असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय.

## मांडणी व मजकूर दोन्ही उत्तम

स.न.वि.वि.

माहे नोव्हेंबर - डिसेंबर ९५ चा श्री साईलीलाचा अंक मिळाला. मांडणी आणि मजकूर दोन्ही उत्तम आहे. संतसंग विषयक लेख एकत्र वाचण्यास मिळाल्याने समाधान वाटले.

**- डॉ. नरेंद्र स. कुंटे**
एम.ए.पी.एच.डी.
सोलापूर

## स्टॅंडर्ड व स्पृहणीय अंक

स.न.वि.वि.

आपला श्री साईलीलाचा नोव्हेंबर - डिसेंबर ९५ चा अंक मिळाला. आभारी आहे. सांप्रदायिक असले तरी आपले मासिक स्टॅंडर्ड स्पृहणीय आहे.

**- डॉ. ग. वा. तगारे**
एम.ए.पीएच.डी.
सांगली

## अंक खूपच छान वाटला

स्नेह नमस्कार

श्री साईलीलाचा नोव्हेंबर - डिसेंबर ९५ चा अंक मिळाला. सर्व वाचून काढला. अंक खूपच छान वाटला.

**- प्रा. प्र. द. निकते**
एम.ए.बी.एड
पत्रकार

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १२.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.०० | १८.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.९५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.९५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |


Regist...
of News-papers of India
No. MH/527



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक मे-जून १९९६

# श्री साईलीला

(तीर्थ-क्षेत्र विशेषांक) रु. ८



शिरडीच आम्हा पंढरपुर । शिरडीच जगन्नाथ द्वारकानगर ।
[illegible]

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सो. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

श्री साईबाबांच्या संस्थान शिरडीचे,
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक २ - ३

मे - जून
१९९६

संपादक
✣ द. म. सुकथनकर ✣

कार्यकारी संपादक
✣ विद्याधर ताठे ✣

कार्यालय

'साईनिकेतन'
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४
दूरध्वनी : ४१२२५६१
फॅक्स : (०२२) ४१५०७९८


मुद्रक
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत रु. ८/- फक्त

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे छापून प्रसिध्द केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिध्द झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

सारी तीर्थे करुनिया वास ।
शिर्डी रुपात प्रगटली ।



## श्री साईलीला
## ( तीर्थक्षेत्र विशेषांक : अंतरंग )


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | द. म. सुकथनकर | २ |
| महाराष्ट्रातील अष्टविनायक | लता आचार्य | ४ |
| सारी तीर्थे करूनिया वास । | श्री साईसच्चरितातून | ६ |
| श्री साईबाबांची लीलानगरी : श्रीशिरडी | विद्याधर ताठे | १० |
| दत्तात्रयाची तीर्थक्षेत्रे | गजानन कुलकर्णी | १४ |
| भृगूतीर्थ | अशोक मोहिते | २० |
| हिमालयातील तीर्थक्षेत्रे | प्र. दि. कुलकर्णी | २३ |
| एका दत्तभक्ताची गिरनार यात्रा (यात्रा वर्णन) | माधवराव भागवत | २७ |
| काही तीर्थक्षेत्रे (बालाजी, कांची, गया) | सौ. उषा देशमुख | ३१ |
| मला आवडलेले देवक्षेत्र (वेळणेश्वर, अंबव) | वेदमूर्ती स. कृ. देवधर | ३४ |
| श्री रामवरदायिनीचे महात्म्य | सुरेंद्र गाडवे | ३७ |
| बाप तीर्थ पंढरी | ह.भ.प. शंकरमहाराज बडवे | ३९ |
| श्रीक्षेत्र शिरडी वृत्त | ——— | ४२ |
| अभिप्राय | ——— | ४५ |

# संपादकीय...

शिरडीच आम्हा पंढरपूर । शिरडी जगन्नाथ द्वारकानगर ।
शिरडीच आम्हा गया काशी विश्वेश्वर । रामेश्वरही शिरडीच ।

भारतातील तीर्थे आणि क्षेत्रे ही भारतीय समाजाच्या एकात्मतेची प्रतिके आहेत. वेद काळापासून आज पर्यंत भारतीयांनी तीर्थक्षेत्रांविषयीची आपली श्रध्दा उत्कटतेने जपलेली - जतन केलेली आहे. अनेक वंश, अनेक जाती-असंख्य उपजाती-नाना भाषा, प्रांत आणि वेगवेगळ्या चालीरीती असलेला अवाढव्य असा हा भारतीय समाज एकात्म व एकसंघ ठेवण्यात तीर्थ-क्षेत्रांनी केलेली कामगिरी विशेष लक्षणीयच नव्हे तर अपूर्व अशी आहे.

चार धाम, सप्तपुऱ्या, सप्तकुलपर्वत, सप्तसरिता, शक्तीपीठे, बारा जोतिर्लिंगे इत्यादी पवित्र श्रध्दास्थाने हिमालय ते कन्याकुमारी आणि द्वारका ते जगन्नाथपुरी पर्यंत भारतभर विखुरलेली असून या तीर्थ-क्षेत्रांची निसर्गरम्य स्थाने पाहून भारतीय मनिषींचे विलक्षण मोठेपण लक्षात येते. 'निसर्गाकडे चला' म्हणून पाश्चात्य देशातील विचारवंतांना, कॉंक्रिटच्या जंगलात प्रदूषणग्रस्त वातावरणात राहणाऱ्या माणसांना, जो संदेश आज द्यावा लागत आहे तो भारतीयांना त्यांच्या ऋषीमुनींनी, विविध 'तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करा' या उपदेशाने फार प्राचीन काळी दिलेला आहे. भारतीय तीर्थक्षेत्रांची यात्रा म्हणजे एक निसर्गयात्राच आहे. निसर्गाशी सुसंवाद निसर्गासमवेत सहजीवन हाच मानवी जीवनाच्या सुखाचा खरा राजमार्ग असून भारतीय तीथ-क्षेत्रे हाच संदेश देत आहेत असे मला वाटते.

# संपादकीय...

निसर्गाच्या जेवढ्या जवळ माणूस जाईल तेव्हढे त्याचे राग-लोभ, मद-मत्सर हे विकार कमी होतात व तो नैसर्गिक सत्प्रवृत्तीने प्रेरित होतो. निसर्गाचा सर्वात मोठा गुण कोणता ? उदारता व निर्वैरता ! सूर्य-चंद्र आपला प्रकाश आपल्याजवळ न ठेवता सर्वांना वाटून टाकतात, झाडे आपली फळे स्वत: संग्रह करीत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे नदीचे पाणी वाघ व बकरी यांची तहान भागवितांना भेद करीत नाही.

**जो खांडावया घाव घाली । कि लावणी जयाने केली ।**
**दोघा एकची साऊली । वृक्ष दे जैसा ।**

हा निसर्गाचा गुण लक्षात घेता निसर्गसानिध्याचे महत्व काय ते आपल्या लक्षात येते व त्याद्वारे तीर्थयात्रांचे महात्म्यही समजून येते असे मला वाटते. अशा व्यापक जाणीवेतूनच आम्ही **'श्री साईलीला'** चा हा अंक तीर्थक्षेत्र विशेषांक म्हणून सिध्द केलेला आहे.

या छोटयाशा अंकात भारतातील असंख्य अशा सर्वच तीर्थ-क्षेत्रांचा परिचय करून देणे अवघड नव्हे तर केवळ अशक्य आहे, हे आपण जाणताच. त्यामुळे अंकाच्या मर्यादित शक्य तेव्हढ्या अधिकाधिक तीर्थ-क्षेत्रांचा समावेश करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. तो वाचकांनी गोड मानून घ्यावा, हीच प्रार्थना.

श्रीक्षेत्र तिरुपती, श्रीक्षेत्र पंढरपूर प्रमाणे अलिकडच्या काळामध्ये श्री साईबाबांचे शिरडी हे ही श्रध्दावंतांचे फार मोठे क्षेत्र म्हणून सर्वदूर नावलौकिकास प्राप्त झालेले आहे. शिरडीचे हे वाढते महत्व लक्षात घेऊन शिरडीचा सविस्तर परिचयही या अंकात देण्यात आलेला आहे. साई-भक्तांना तर शिरडी म्हणजे सर्व तीर्थांचे तीर्थ, सर्व क्षेत्रांचे क्षेत्र आहे.

शिरडीच आम्हा बद्रीकेदार । शिरडीच नासिक - त्र्यंबकेश्वर ।
शिरडीच उज्जयिनी महाकाळेश्वर । शिरडीच महाबळेश्वर गोकर्ण ।

**- द. म. सुकथनकर**
संपादक, **'श्रीसाईलीला'**
अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

गजानना तू गणराया । आधी वंदू तूज मोरया ।।

# महाराष्ट्रातील अष्टविनायक

- लता आचार्य



गणपती ही देवता अत्यंत प्राचिन असली तरी महाराष्ट्रात गणेशभक्तीचे विशेष महात्म्य निर्माण झाले ते पेशव्यांपासून. नंतर लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव प्रारंभ करून गणेशभक्तीला सामाजिक संघटनेचे रुप दिले. सध्या तर गणेशोत्सव हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य झालेले आहे. अशा या गणेशभक्तीतूनच अष्टविनायक यात्रेचा उगम झाला आहे. त्या अष्टविनायकांचे हे शब्दस्तवन -

स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिध्दिदम् ।
बल्लाळं मुरुडं विनायक मढं चिंतामणिं थेवरम् ।।
लेण्याद्रिं गिरिजात्मकं सुवरंद विघ्नेश्वरं ओझरम् ।।
ग्रामे रांजण संस्थिते गणपतिं कुर्यात् सदा मंगलम् ।।

अष्टविनायकदर्शन ही आज प्रत्येक भाविकाने अगदी करायलाच हवी अशी यात्रा आहे. हजारो, लाखो भक्तगण, गणेशाच्या या आठ शक्तिकेंद्रांच्या ठिकाणी जाऊन आत्मिक समाधान प्राप्त करुन घेत असतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमोरेश्वर | - | मोरगाव |
| २. | श्रीचिंतामणि | - | थेऊर |
| ३. | श्रीबल्लाळेश्वर | - | पाली |
| ४. | श्रीवरदविनायक | - | महड |
| ५. | श्रीगिरिजात्मक | - | लेण्याद्रि |
| ६. | श्रीविघ्नेश्वर | - | ओझर |
| ७. | श्रीमहागणपती | - | रांजणगाव |
| ८. | श्रीसिध्दिविनायक | - | सिध्दटेक |

अशी ही अष्टविनायकांची आठ जागृत शक्तिकेंद्रे आहेत.

**१. श्रीमोरेश्वर-मोरगाव, जि. पुणे** - पुणे-सोलापूर महामार्गावर ५६ कि. मी. अंतरावरील चौफुला फाट्यावरून उजवीकडे निरामार्गावर मोरगाव हे अष्टविनायकातील प्रमुख क्षेत्र आहे. पुणे-हडपसर-लोणी-यवत-चौफुला-सुपा-मोरगाव हे अंतर ७९ कि. मी. आहे. पुणे-हडपसर-सासवड-जेजुरी-मोरगाव हा ६४ कि. मी. चा दुसरा एक मार्ग आहे. मंदिर उत्तराभिमुख आहे. स्वयंभू मूर्ती मखरात बसविलेली आहे. वर नागफणा आहे. मूर्तीच्या डोळ्यांत दैदीप्यमान हिरे बसविलेले आहेत. सभामंडपात आठ दिशांना अष्टगणपती आहेत. १. एकदंत, २. महोदर, ३. गजानन, ४. लंबोदर, ५. विकट, ६. नटराज, ७. धूम्रवर्ण, ८. वक्रतुंड शिवाय २३ परिवारमूर्तीही मंदिरातच बसविलेल्या आहेत. या गणपतीसमोर मोठ्ठा उंदीर आहेच पण मोठ्ठा नंदीही आहे. हे येथील एक वैशिष्ट्य आहे. येथे अनेक उपाध्ये-मंडळींच्या घरी राहाण्या-जेवणाची सोय आहे. येथे सर्वांच्या इष्टकामना पूर्ण होतात अशी ख्याती आहे.

महाराष्ट्राचे आद्यदैवत खंडोबा आहे. हे अत्यंत जाज्वल्य दैवत जेजुरीच्या डोंगरावर आहे. ३६५ पायऱ्या चढून गेल्यावर खंडोबाचे दर्शन घेता येते. हे ठिकाण मोरगाव-पुणे मार्गावर प्रत्येकाने पाहावे असे आहे.

**२. श्रीचिंतामणि - थेऊर, जि. पुणे** - पुणे-सोलापूर

महामार्गावर हडपसरच्या नंतर लोणीच्या पुढे ३ कि. मी. अंतरावर डाव्या बाजूला थेऊरचा फाटा आहे. पुणे-थेऊर एकूण अंतर २५ कि. मी. आहे. थेऊरच्या या चिंतामणीच्या मंदिराचे महाद्वार उत्तरभिमुख असले तरी मूर्ती मात्र पूर्वाभिमुख आहे. ती डाव्या सोंडेची व मांडी घालून बसलेली आहे. मूर्ती स्वयंभू आहे. मोरया गोसावी यांना येथे सिध्दी प्राप्त झाली म्हणून या स्थानाला असाधारण महत्त्व आहे.

**३. श्रीबल्लाळेश्वर - पाली, जि. रायगड** - मुंबईहून पनवेल-खोपोलीमार्गे पाली या १२४ कि. मी. मार्गाव्यतिरिक्त पनवेल-पेण-वडखळ-नागोठणे-वाकणमार्गे पाली या १२० कि. मी. च्या मार्गानेही जाता येते. पुण्याहून लोणावळा-खोपोलीमार्गे पाली हे अंतर १११ कि. मी. आहे. श्रीबल्लाळेश्वराचे मंदिर व मूर्ती पूर्वाभिमुख आहेत. मूर्ती स्वयंभू आहे. या देवळातील भव्य घंटा व प्रचंड दगडी बांधकाम ही येथील वैशिष्ट्ये आहेत. श्रीबल्लाळेश्वर नवसाला पावतोच पावतो असा अनेक भाविकांचा अनुभव आहे. येथे यात्रेकरूंची राहाण्या-जेवणाची सोय होऊ शकते.

**४. श्रीवरदविनायक - महड (मढ), जि. रायगड** - मुंबई-पनवेल-खोपोली मार्गावर खोपोलीच्या अलिकडे ६ कि.मी. अंतरावर हाळ येथे उजवीकडे महडसाठी रस्ता जातो. मुंबई-महाड अंतर ८ कि. मी. आहे. पुणे-लोणावळा-खोपोलीनंतर हाळ येथे महडसाठी डावीकडे रस्ता जातो. पुणे-महड अंतर ८३ कि. मी. आहे. या वरदविनायकाचे मंदिर व डाव्या सोंडेची मूर्ती पूर्वाभिमूख आहेत. मूर्तीच्या बाजूला ऋध्दी-सिध्दी आहेत. १६९० मध्ये तळयात सापडलेल्या मूर्तीची मंदिरात प्रतिष्ठापना सन १७२५ मध्ये झाली. सन १८९२ पासून तेवत असलेला नंदादीप हे येथील वैशिष्ट्य आहे. या वरदविनायकाची श्रध्देने सेवा केल्यास साक्षात दर्शन घडते असा अनुभव सांगतात.

**५. श्रीगिरिजात्मज - लेण्याद्रि, जि. पुणे** - पुणे-नाशिक महामार्गावर चाकण-राजगुरुनगर-मंचर-नारायणगावहून जुन्नरमार्गे लेण्याद्रि हे अंतर पुण्यापासून ९४ कि. मी. आहे. श्रीगिरिजात्मजाच्या दर्शनाला जाण्यासाठी ३०२ पायऱ्या चढून जाव्या लागतात. खडकांत कोरलेले लेणीस्वरूप हे मंदिर दक्षिणाभिमुख असून दगडातच कोरलेली मूर्ती उत्तराभिमुख आहे. सुमारे ५०/६० फूट लांबी-रुंदीचा सभामंडप अखंड खडकात कोरलेला असून मध्ये एकही खांब नाही हे या सभामंडपाचे वैशिष्ट्य आहे. इतक्या उंचीवरही मंदिराबाहेर एक थंड व मधूर पाण्याची विहीर आहे.

**६. श्रीविघ्नेश्वर - ओझर, जि. पुणे** - पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगावाहूनच ओझर हे अंतर पुण्यापासून ८५ कि. मी. आहे. कुकडी नदीच्या काठावरील हे विघ्नेश्वराचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मूर्ती डाव्या सोंडची, स्वयंभू असून तीही पूर्वाभिमुख आहे. मंदिर भव्य असून सुंदर आहे. भोवती दगडी तट आहे. येथे राहाण्या-जेवणाची व्यवस्था होऊ शकते.

मुंबई-ठाणे-कल्याण-बापसई-सरळगाव-ओतूरमार्गे लेण्याद्री १७१ कि. मी. व ओझर १८२ कि. मी. आहे. शिवनेरी हे छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान, अतिशय रम्य ठिकाण लेण्याद्रि व ओझर बरोबरीने पाहाता येते. जुन्नर शिवनेरी ह अंतर ७ कि. मी. आहे.

**७. श्रीमहागणपती - रांजणगाव, जि. पुणे** - पुणे-नगर महामार्गावर पुणे-कोरेगाव-शिक्रापूरमार्गे रांजणगाव हे श्रीक्षेत्र शिरुरच्या अलीकडे २१ कि. मी. अंतरावर पुण्यापासून ५० कि. मी. अंतरावर आहे. रांजणगावचे श्री महागणपतीचे मंदिर पूर्वाभिमुख असून मुख्य रस्त्याला लागूनच उजवीकडे आहे. दक्षिणायन आणि उत्तरायण यांच्या मध्य काळात सूर्याचे किरण मूर्तीवर पडतील अशी मंदिराची वैशिष्ट्यपूर्ण बांधणी केलेली आहे. मूळ मूर्तीला 'महोत्कट' असे नाव असून तिला दहा सोंडा व वीस हात आहेत असे म्हणतात. परंतु ती तळघरात ठेवलेली आहे. येथील पूजेकरिता ठेवलेल्या मूर्तीच्या बाजूला ऋध्दी-सिध्दी आहेत. यात्रेकरुंच्या राहाण्या-जेवण्याची सोय येथे होऊ शकते.

**८. श्रीसिध्दिविनायक - सिध्दटेक, जि. अहमदनगर** - पुणे-सोलापूर महामार्गावर पुण्याहून हडपसर-लोणी-यवत-चौफुला-पाटसमार्गे दौंड ७८ कि. मी. अंतरावर आहे. दौंडहून २० कि. मी. वर (होडीतून नदी पार करून गेल्यावर) सिध्दटेक हे सिध्दिविनायकाचे सिध्दिक्षेत्र आहे. दौंड-काष्टी-श्रीगोंदा-पेडगावमार्गे सिध्दटेक हे सिध्दिविनायकाचे सिध्दिक्षेत्र आहे. दौंड-काष्टी-श्रीगोंदा-पेडगावमार्गे सिध्दटेक या ४८ कि. मी. च्या लांबीच्या मार्गाने (होडीतून नदी पार न करता) जाता येते. याशिवाय पाटसवरून दौंडला न जाता रावणगाव-भिगवणमार्गे राशीनहूनही सिध्दटेकला जाता येते. पुण्याहून हे अंतर १४२ कि. मी. आहे. हे सिध्दिक्षेत्र भीमा नदीच्या काठावर आहे. मंदिर व मूर्ती उत्तराभिमुख आहेत. मूर्ती स्वयंभू, उजव्या सोंडेची, गजमुखी आहे. येथे राहाण्याची, जेवणा-खाण्याची व्यवस्था होऊ शकते. हे अत्यंत जागृत व कडक सिध्दिस्थान आहे. श्रीविष्णुला येथे सिध्दी प्राप्त झाली अशी पुराण कथा आहे. सिध्दीप्राप्तीसाठी अत्यंत योग्य असे स्थान आहे.

या गणेशस्थानांचे महात्म्य मुदगल आदी पुराणांत दिलेले आहे. अशा या श्रीगणपतीची उपासना प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. परंतु गेली २०० वर्षे ती महाराष्ट्रात अधिक लोकप्रिय झाली आहे. सुखकर्ता व दुखःहर्ता अशा गणेशाची ही आठ जागृत शक्तिपीठे; ज्यांचे दर्शन घेतल्याने सर्व प्रकारची संकटे, त्रास नष्ट होतात आणि 'जो जे वांछील; तो ते लाहो' असे घडते. प्रत्येकाने ही अष्टविनायकाची यात्रा एकदा तरी करावी, भक्तीभावाने पुन्हा पुन्हा करावी, जय श्रीगणेश !

❑ ❑ ❑

# सारी तीर्थे करुनिया वास ।
# शिर्डी रुपात प्रगटली ।।

साईबाबांचे परमभक्त संतकवि दासगणू महाराज जेव्हां गंगा स्नानास जाण्याचा बाबांकडे हट्ट करू लागले तेव्हां बाबांनी त्यांना तेथेच गंगायमुनेचे दर्शन घडविले. अशाच प्रकारे अनेक भक्तांना साईबाबांनी विविध रुपात दर्शन देऊन ती ती तीर्थक्षेत्रे शिरडीत असल्याची प्रचिती आणून दिली होती. साईभक्त हेमाडपंत यांच्या श्रीसाईसच्चरित मधील अध्याय ४ मधील पुढील ओव्या श्रीशिरडीचे महात्म्य कथन करणाऱ्या आहेत. भक्तांना त्याद्वारे शिरडीचे अगाध महात्म्य समजून घ्यावे.



शिरडीतील खंडोबा मंदिर, साईंचे प्रथम आगमन स्थळ

जैसे गाणगापुर नृसिंहवाडी । जैसें औदुंबर वा भिल्लवडी ।
तैसेचि पवित्र गोदेचे थडी । क्षेत्र 'शिरडी' प्रसिध्द ।।२९।।

गोदावरीचें पवित्र तीर । गोदावरीचें पवित्र नीर ।
गोदावरीचा शीतसमीर । हीं भवतिमिरनाशक ।।३०।।

गोदावरीचें महात्म्य रुचिर । प्रख्यात जें अखिल जगतीवर ।
एकाहूनि एक धुरंधर । संतप्रवर तेथें झाले ।।३१।।